**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

Vol - VI Issue - VII JULY 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# केंद्रीय वखार महामंडळ चा आर्थिक अभ्यास

**डॉ. अरुण बळीराम धालगडे**
विभागप्रमुख, वाणिज्य विभाग,
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

**प्रस्तावना-**

**या** महामंडळाची स्थापना १९५७ मध्ये करण्यात आली आहे. सध्याचे अधिकृत भागभांडवल १०० कोटी असून त्यापैकी वसुल झालेले भागभांडवल ६८.०२ कोटी आहे. हे वसुल भागभांडवल भारत सरकार, स्टेट बँक, अन्य व्यापारी बँका, सहकारी संस्था, विमा कंपन्या यांनी खरेदी केलेले आहे. या भागभांडवलावर ठराविक दराने लाभांश देण्याची हमी केंद्र सरकारने घेतली आहे. हे महामंडळ सुरुवातीला १९५७ मध्ये ॲग्रिकल्चर (शेती उत्पादन-विकास व वखार) मंडळ ॲक्ट १९५६ अन्वये कार्यरत होते. सध्या हे महामंडळ द वेअर हाऊसिंग कार्पोरेशन ॲक्ट १९६२ नुसार कार्य करीत आहे. या महामंडळाचे कामकाज पाहण्यासाठी १३ प्रतिनिधींचे संचालक मंडळ कार्यरत असून दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी ३ सदस्यांची कार्यकारी समिती आहे. हेच महामंडळाचे दैनंदिन व्यवस्थापन करीत आहे. गोदाम वितरण सेवा किंवा त्या संबंधित कार्यातील क्षेत्रामध्ये ग्राहकांच्या समाधानासाठी मूल्य संवर्धनासहित संपूर्ण गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध करून देण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे.

**संशोधनपत्राचे उद्देश-**

१. केंद्रीय वखार महामंडळा विषयीची माहिती गोळा करुन अभ्यास करणे.
२. केंद्रीय वखार महामंडळाचा आर्थिक अभ्यास करणे.

**माहिती संकलनाचे स्त्रोत-**

१. संशोधनपत्रासाठी वार्षिक अहवाल व वेबसाईट इ. दूय्यम माहितीचा आधार घेतलेला आहे.

**उद्देश :**

१) हे महामंडळ शास्त्रीय गोदामांची निर्मिती, साठवण, वितरण करण्याबरोबरच शेतीमाल, बी-बियाणे, शेतीची अवजारे तसेच शेतीला सहाय्यक वस्तूंची खरेदी आणि विक्री करण्याचे कार्य करीत आहे.
२) ग्राहक समाधानाला बळ देऊन भारतीय अर्थव्यवस्थेला सांभाळून एकीकृत गोदाम संरचना व अन्य साठवणूक सेवा प्रदान करण्याची व्यापारी बाजारामध्ये एक अग्रणी गोदाम संरचना उभी करणे.
१) पर्यावरणाला अनुकूल पद्धतीचा वापर करून किटक नियंत्रण सेवा प्रदान करण्यासाठी महत्त्वाची भूमिका निभावत आहे.
२) पत/आर्थिक कुवत (कर्ज पुरवठा) वाढविण्यासाठी गोदाम (विकास व नियमन) अधिनियम २००७ च्या अंमलबजावणीसाठी व मदत करण्यासाठी बँकींग संस्थासाठी गोदाम पावती तारण योजना राबविणे. गोदाम, हाताळणी, साठवण आणि वितरण यातील नुकसान कमी करणे.[१]

तक्ता क्र.१

**केंद्रीय वखार महामंडळाचे आर्थिक कार्याचे मुल्यमापन**

तक्ता क्र.१

केंद्रीय वखार महामंडळाचे आर्थिक कार्याचे मुल्यमापन

| अ.क्र. | तपशिल | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | उलाढाल | ७७६.२३ | ८४९.२५ | ९८७.९५ | १०२९.५५ | १२१८.६५ | १४०६.७० | १५२८.११ |
| | (प्रतिशत कोटी रुपयांमध्ये) | १०० | १०९.४० | १२७.२७ | १३२.६३ | १५६.९९ | १८१.२२ | १९७.०० |
| २. | प्रचालन परिव्यय खर्च | ६२१.४७ | ७३८.८१ | ८२४.०७ | ८२५.८२ | १०५१.५३ | ११९७.४७ | १२७२ |
| | (सकल खर्च रु.कोटी) | १०० | ११८.८८ | १३२.६० | १३२.८८ | १७०.४८ | १९२.६८ | २०५.०० |
| ३. | करापुर्वीचा नफा | १५४.७६ | ११०.४४ | १६३.८८ | २०३.७३ | १५९.१३ | २०९.२३ | २५६.४७ |
| | | १०० | ७१.३६ | १०५.८९ | १३१.६४ | १०२.८२ | १३५.१९ | १८७.०० |
| ४. | करानंतरचा नफा | १३६.११ | ११०.४६ | १३०.५२ | १३६.१७ | १००.४६ | १३९.५५ | १६१.०५ |
| | | १०० | ८०.६८ | ९५.३३ | ९९.४५ | ७३.३७ | १०२.०० | ११८.०० |
| ५. | स्थूल नफा | १९९.९५ | १५५.१४ | २०३.३६ | २३६.५८ | २०४.५५ | २७२.२३ | २९४.२८ |
| | | १०० | ७७.५८ | १०१.७० | ११८.२९ | १०२.३१ | १३६.०० | १४७.०० |
| ६. | निव्वळ मुल्य (संपत्तीचे) | १०८०.२४ | ११५६.३२ | ११४०.५० | १२३२.३२ | १३०४.०८ | १४३०.२३ | १५५३.०० |
| | | १०० | १०७.०४ | १०५.५८ | ११४.०७ | १२०.७२ | १३२.०० | १४४.०० |
| ७. | भांडवल गुंतवणूक | १०११.६२ | १०६४.०२ | १०४९.१५ | ११७१.२२ | १२२८.१० | १३५१.३१ | १५०१.०० |
| | | १०० | १०५.१७ | १०३.७० | ११५.७७ | १२१.४७ | १३२.०० | १४८.०० |
| ८. | लाभांश टक्केवारी | ३० | ३० | ३८ | ४० | ४० | ४१ | |


स्रोत : केंद्रीय वखार महामंडळाचे वार्षिक अहवाल, २००७-०८ ते २०१३-१४. २

तक्ता क्र.१ मध्ये केंद्रीय वखार महामंडळाच्या गोदाम कार्याचे आर्थिक बाबींचे मूल्यपामन केले आहे. या तक्त्यामध्ये महामंडळाची वार्षिक उलाढाल, प्रचालन खर्च, करापुर्वीचा लाभ, करानंतरचा लाभ, स्थूल नफा, निव्वळ नफा, निव्वळ मूल्य, भांडवल गुंतवणुक इ. माहिती रूपये कोटीमध्ये दर्शविली आहे. तसेच लाभांशांची टक्केवारी दिली आहे. सन २००७-०८ ते २०१३-१४ या ७ वर्षाची तपशीलवार माहिती दिलेली आहे.

**निष्कर्ष-**

वरील तक्त्यावरून असे निष्कर्ष काढता येतात की, महामंडळाची उलाढाल २००७-०८ मधील रू.७७६.२३ कोटी होती. त्यामध्ये २०१३-१४ मध्ये वाढ होवून रू.१५२८.१९ झाली आहे. या वर्षातील वार्षिक उलाढाल ९७ टक्यांनी वाढलेली दिसून येत आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, महामंडळाची उलाढाल सतत वाढत आहे. प्रचालन खर्च २००७-०८ रू.६२१.४७ कोटी होता तर २०१३-१४ मध्ये परीव्यय खर्च रू.१२७२ कोटी आहे. त्यामध्ये १०५ टक्यांनी वाढ झालेली आहे म्हणजेच महामंडळाच्या प्रचालन खर्चात सतत वाढ झाली आहे.

आलेख क्र.१




तक्ता क्र.१मध्ये करापूर्वीचा नफा २००७-०८ ते २०१३-१४ या ७ वर्षाची आकडेवारी रूपये कोटी मध्ये दर्शविली आहे. या तक्त्यावरुन असा निष्कर्ष निघतो की, २००७-०८ यावर्षी रू.१५४.७६ कोटी करापूर्वीचा लाभ होता. तर २०१३-१४ त्यामध्ये वाढ होऊन रू.२०९.२३ कोटी झाला आहे. त्यामध्ये ३५.१९ टक्क्यांनी घट झालेली आहे. सन २००७-०८ च्या तुलनेत २००८-०९ मध्ये २८.६४ टक्क्यांनी घट झालेली आहे. इतर सहा वर्षामध्ये ८७ टक्के इतकी वाढ झालेली दिसून येते.

तक्ता क्र.१ मध्ये करानंतरचा नफा २००७-०८ ते २०१३-१४ अशा ७ वर्षाची आकडेवारी रूपये कोटी दर्शविला आहे. २००७-०८ या वर्षी करानंतरचा नफा रू.१३६.९१ कोटी होता. त्यामध्ये २०१३-१४ वाढ होवून रू.१६१.०५ कोटी झाला आहे. त्यामध्ये १८ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. तसेच २००८-०९ ते २०११-१२ या चार वर्षामध्ये २००७-०८ च्या तुलतेत नफ्यात घट झालेली दिसून येते. त्याचे कारण पेन्शननिधी व इतर निधीची मोठ्या प्रमाणात तरतुद केलेली दिसून येत आहे.

तक्ता क्र.१ मध्ये २००७-०८ ते २०१३-१४ या सात वर्षाची स्थूल नफ्याची टक्केवारी रूपये कोटी मध्ये दर्शविली आहे. सन २००७-०८ या वर्षाचा स्थूलनफा रू.१९९.९५ कोटी आहे. त्यामध्ये सतत वाढ होवून तो २०१३-१४ रू.२९४.२८ कोटी झाला आहे. २०१३-१४ मध्ये ४७ टक्यांनी वाढलेला आहे. परंतु सन २००८-०९ मध्ये स्थूल नफ्यामध्ये २२.४२ टक्क्यांनी घट झालेली आहे कारण म्हणजे प्रशासकीय खर्चात वाढ झालेली आहे.

तक्ता क्र.१ मध्ये महामंडळाच्या संपत्तीचे निव्वळ मूल्य २००७-०८ ते २०१३-१४ या वर्षाचे रुपये कोटी मध्ये दर्शविलेले आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, महामंडळाचे २००७-०८ चे संपत्तीचे निव्वळ मूल्य रू.१०८०.२४ कोटी आहे. त्यामध्ये वाढ होवून सन २०१३-१४ मध्ये रू.१५५३ कोटी झाले आहे. त्यामध्ये ४४ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. महामंडळाच्या संपत्तीच्या निव्वळ मूल्यास सतत वृध्दी झालेली आहे. तक्ता क्र.४.९ मध्ये महामंडळाची भांडवल गुंतवणूक सात वर्षांची रुपये कोटीमध्ये दर्शिविलेली आहे. सन २००७-०८ मध्ये भांडवल गुंतवणूक रू.१०११.६ कोटी होती त्यामध्ये वाढ होऊन ती रू.१५०१ कोटी झाली होती. त्यामध्ये सतत वाढ होवून २०१३-१४ वर्षी ४८ टक्क्यांनी वाढ झाली आहे. यावरुन असा निष्कर्ष महामंडळाची भांडवल गुंतवणूक सतत वाढत आहे. या महामंडळाने भागधारकांनी सतत ३० ते ४२ टक्के इतका लाभांश दिलेला दिसून येत आहे. हे महामंडळ सतत नफ्यात असल्यानेच हे शक्य झाले आहे.

**संदर्भ**

१) केंद्रीय वखार महामंडळ, वार्षिक अहवाल, २०१३-१४, पृ.क्र.८.
२) स्रोत : केंद्रीय वखार महामंडळाचे वार्षिक अहवाल, २००७-०८ ते २०१३-१४.